# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## सर्पदंशाने आश्रमशाळेतील तीन मुलींच्या मृत्यूचे मंत्रालयात पडसाद; मुख्यमंत्री फडणवीसांकडून अधिकाऱ्याच्या निलंबनाचे आदेश

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्याचे मुख्यमंत्री ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्या गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रम शाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आश्रमशाळेत झोपलेल्या ६ विद्यार्थीना एकाचवेळी सर्पदंश झाला. त्यामध्ये, तीन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनी जखमी असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्दैवी आणि संतापजनक घटनेचे पडसाद आज मंत्रालयात उमटल्याचं दिसून आलं. आदिवासी मंत्री महोदयांनी याबाबत, संबंधित आश्रमशाळेच्या संस्थापकांविरुद्ध मंत्रिमंडळ बैठकीत संताप व्यक्त केला. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आश्रमशाळेची पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यास निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.आश्रमशाळेतील तीन मुलींचा मृत्यू झाल्याची बाब गंभीर असल्याचे सांगत, आदिवासीमंत्र्यांनी संताप व्यक्त केला. काँग्रेसचे मारोतराव कोवासे यांच्यासारखे ३ वेळा आमदार, एकदा खासदार राहिलेले नेते आश्रमशाळा असे चालवत असतील आणि लहान मुलींच्या सुरक्षेशी खेळत असतील, तर ते कसे माफ करणार? असा सवालच आदिवासी मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत विचारला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेनंतर कारवाईचे आदेश दिले आहेत.


(वर्ष ६५ वे अंक २०४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१२ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# शिवसेना पक्ष-चिन्ह प्रकरणी आमदारांतील फूट म्हणजे पक्षात फूट नाही


## आयोगाकडून अधिकारक्षेत्राचा गैरवापर; सिब्बल यांचा आक्रमक युक्तिवाद, आज पुन्हा सुनावणी

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात तिसऱ्या दिवशीचा वादळी युक्तिवाद पूर्ण झाला आहे. आजच्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाची भूमिका, लोकप्रतिनिधी कायदा आणि पक्षाच्या घटनेवरून आयोगाच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवला. आजचे कामकाज संपले असून, या ऐतिहासिक खटल्याची पुढील सुनावणी आता उद्या दुपारी २ वाजता पुन्हा सुरू होणार आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर ही सुनावणी सुरू आहे.

कपिल सिब्बल यांनी या बंडाचं नेतृत्व करणाऱ्या आणि नंतर शिवसेनेचे मुख्य नेते बनलेल्या एकनाथ शिंदे यांच्या मुख्य नेते पदी करण्यात आलेल्या निवडीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. शिवसेनेच्या १९९९ सालच्या घटनेचा दाखला देत कपिल सिब्बल यांनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यनेते पदी झालेल्या निवडीला आव्हान दिले आहे.

याबाबत युक्तिवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले की, शिवसेनेच्या १९९९ सालच्या घटनेमध्ये मुख्य नेता नावाचं कुठलंही पद नव्हतं. मग कोणत्या घटनेच्या आधारावर एकनाथ शिंदे यांनी स्वत:ला हे पद बहाल केले आहे? निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे ही २०१० मध्ये लागू झाली आहे. तुमची निवड किंवा नियुक्ती ही पक्षाच्या घटनेनुसार झाली आहे आणि राजकीय पक्षात फूट पडली आहे, असे पॅरा १५ गृहित धरतो. अशावेळी पक्षाच्या घटनेच्या वैधतेचा पॅर १५ शी काय संबंध उरतो, असा प्रश्नही सिब्बल यांनी उपस्थित केला.

कपिल सिब्बल पुढे म्हणाले की, निवडणूक आयोग हा केवळ लवाद आहे. पक्षाची घटनाही लोकशाहीनुसार



आहे की लोकशाहीविरोधी आहे हे निवडणूक आयोग ठरवू शकत नाही. आता काही काळासाठी आमच्या पक्षाची घटना ही लोकशाहीविरोधी होती असे मी मानतो. मात्र त्याचे काय परिणाम होतात? तर संबंधित पक्षाची मान्यता रद्द होते. मात्र याशिवाय निवडणूक आयोगाला अन्य काहीही अधिकार नाहीत. पक्षातील शिंदे गट हा देखील याच घटनेनुसार तयार झाला आहे. मग त्यांना पक्षाचं चिन्ह कसं काय मिळू शकतं? पक्षाची घटना लोकशाहीविरोधी असेल तर त्याची परिणती म्हणून पक्षाची नोंदणी रद्द करण्याची नोटिस मिळायला हवी होती. मात्र याचा दुसऱ्या गटाला फायदा कसा मिळू शकतो, असा सवालही कपिल सिब्बल यांनी उपस्थित केला.

कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, "निवडणूक आयोगाने २१ जून, २५ जून आणि १ जुलै २०२२च्या ज्या पत्रांचा आधार घेतला, ती केवळ विधिमंडळ पक्षातील (आमदारांच्या) बैठकीशी आणि घडामोडींशी संबंधित होती. आमदारांनी वेगळी बैठक घेणे किंवा वेगळा गटनेता-प्रतोद नेमणे, म्हणजे मूळ राजकीय पक्षात फूट पडली असा अर्थ होत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या राणा आणि सुभाष देसाई खटल्यांतील निकालांनुसार, विधिमंडळ पक्षातील फूट आणि मूळ राजकीय पक्षातील फूट या दोन पूर्णपणे वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे केवळ आमदारांच्या फुटीवर आधारित निवडणूक आयोगाने पॅरा १५ (चिन्ह वाटप आदेश) अंतर्गत स्वतःचे अधिकारक्षेत्र वापरणेच मुळात बेकायदेशीर आहे."

शिंदे गटाने निवडणूक आयोगासमोर शिवसेनेची २०१८ची सुधारित घटना अलोकतांत्रिक होती असा दावा केला होता. त्यावर सिब्बल यांनी कडक आक्षेप घेतला. "ज्या २०१८च्या सुधारित घटनेनुसार शिंदे गटातील नेत्यांची पक्षातील पदे निश्चित झाली, ज्या घटनेअंतर्गत त्यांना विधानसभेची तिकिटे मिळाली आणि ते मंत्री झाले; त्याच घटनेचा संपूर्ण लाभ घेतल्यानंतर ते आता त्या घटनेला अलोकतांत्रिक कसे म्हणू शकतात? ज्या व्यवस्थेचा तुम्ही स्वतः फायदा घेतला, त्याला नंतर सोयीनुसार अलोकतांत्रिक ठरवता येत नाही. जर ती घटना अलोकतांत्रिक असेल, तर त्यांची आमदारकी आणि मंत्रीपदेही अलोकतांत्रिक ठरतात," असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर प्रश्न उपस्थित करत सांगितले की, निवडणूक आयोग ही एका ट्रिब्युनलसारखी काम करते. चिन्ह वाटपाच्या पॅरा १५ अंतर्गत एखाद्या राजकीय पक्षाची घटना लोकशाहीवादी आहे की अलोकतांत्रिक, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही.

## लोकसभेत पुन्हा गदारोळ, कामकाज दिवसभरासाठी तहकूब

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- अयोध्येतील श्रीराम मंदिर देणगी अपहार आणि जंतर-मंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईवर गृहमंत्री अमित शाह यांनी निवेदन करावे, ही मागणी सोमवारीही विरोधकांनी लावून धरली. यामुळे निर्माण झालेल्या गोंधळात लोकसभेचे कामकाज दोनदा तहकूब झाल्यानंतर ते दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

विविध न्यायाधिकरणांचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या निवडीसाठी आयोग स्थापन करण्याची तरतूद असलेले विधेयक सोमवारी लोकसभेत चर्चेविना मंजूर करण्यात आले.

कायदा व न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी 'न्यायाधिकरण सुधारणा विधेयक-२०२६' चर्चा व मंजुरीसाठी सादर केले होते. याशिवाय 'खाण व खनिज सुधारणा विधेयक, केरळ विधेयक तर राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (दुरुस्ती) विधेयक सादर केले.

राज्यसभेतही कामकाज सुरू झाल्यापासून राम मंदिर देणगी अपहार व विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईचा मुद्दा तापला. गृहमंत्री अमित शाह यांनी यावर निवेदन करावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. याची दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षांनी सभात्यागही केला. राज्यसभेत गोंधळातच 'बँकर्स बुक्स एव्हिडन्स विधेयक-२०२६' मंजूर करण्यात आले. हा एक नवीन आधुनिक कायदा असून, १२५ वर्षे जुना वसाहतकालीन १८९१चा कायदा रद्द करून त्या जागी हा नवीन कायदा आता येत आहे. दरम्यान संसदेच्या बाहेर आज विरोधकांनी व सत्ताधाऱ्यांनी एकमेकांविरोधात घोषणा दिल्याने काही काळ वातावरण संतापाचे बनले होते.

## आता 'जन-गण-मन'ऐवजी 'वंदे मातरम्' प्रथम गायले जाणार!; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंची विधेयकाला मंजुरी

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे.

संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे.

नवीन कायद्यानुसार, 'वंदे मातरम'चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन गण मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम'चा यामध्ये समावेश केला आहे.

## विलंबाने मिळणाऱ्या भूसंपादन मोबदल्याच्या व्याज दरात सुधारणा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यास विलंब झाल्यास त्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. आता हा व्याजदर रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना ज्या व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देते त्यापेक्षा एक टक्का अधिकचा असणार आहे.

शासनाच्या विविध विकास प्रकल्प, योजनांसाठी संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीचा प्रकल्पाची निकड विचारात घेऊन आगाऊ ताबा घेणे आवश्यक ठरते. निवाड्यापूर्वी जमीन शासनास सुपूर्द करण्यात येत असल्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ नुसार बाधित व्यक्तीला मोबदल्याच्या रकमेवर विलंबामुळे व्याज दिले जाते. हे व्याजदर व बँकेचे कर्जावरील प्रचलित व्याजदर यामध्ये तफावत असल्याने अधिनियमातील कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना ज्या दराने कर्ज देते त्यामध्ये एक टक्का अधिक दराने व्याज देण्यास येणार आहे. त्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

राज्यात नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती मिळावी यासाठी नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता खरेदी करण्यात आलेल्या जमिनीच्या हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र नवीकरणीय उर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५ ते २०३५-३६ यामध्ये महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीनविषयक कायद्यांतील तरतुदीनुसार २५ टक्के हस्तांतरण शुल्क सूट समाविष्ट करण्यात येणार आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता खरेदी करण्यात आलेल्याजमिनीचे ग्रुप कंपनीअंतर्गत अथवा उपकंपनी अंतर्गत हस्तांतरणासाठी चालू वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार जमिनीच्या बाजारमूल्याच्या २५ टक्के दराने हस्तांतरण शुल्क जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करावे लागत होते. यामुळे प्रकल्पांवर आर्थिक भार पडत असल्याने आणि ऊर्जा प्रकल्प लांबणीवर पडत असल्याने या शुल्कात सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या बरोबरच नवीकरणीय उर्जा प्रकल्पांसाठी मुख्य कंपनीद्वारे प्रथमतः जमीन खरेदी करताना देय मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यात येतो मात्र त्यानंतर स्थापन करण्यात येणाऱ्या ग्रुप कंपनी किंवा स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीद्वारे या जमिनीच्या होणाऱ्या हस्तांतरणात द्यावे लागणारे मुद्रांक शुल्क पूर्ण माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या अखत्यारितील कृषी आयुक्तालयात एक संचालक, दोन (पान ४ वर)

## भाजपने कसला विकास केला, नक्षलवाद संपवला तो उद्योगपतींसाठी; संजय राऊतांचा हल्लाबोल

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू, तर तीन विद्यार्थिनी जखमी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त करत राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रात आदिवासींचा मृत्यू इतका स्वस्त झाला आहे का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी महायुती सरकारवर कडाडून टीका केली आहे.

संजय राऊत म्हणाले, "वाघ, बिबटे, जंगली प्राणी आणि साप हे आदिवासींच्या घरात आणि शाळांमध्ये घुसून बळी घेत आहेत. तुम्ही गडचिरोलीचा नक्षलवाद संपला असे म्हणत आहात, पण आदिवासींचे मृत्यू थांबलेले नाहीत. ते अशा पद्धतीने मारले जात आहेत. तुम्ही आदिवासींचा कसला विकास करत आहात? त्यांना साप अथवा विंचू चावल्यावर उपचार मिळत नाहीत. तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूने जर या राज्याचे सरकार हळहळले नसेल, अस्वस्थ झाले नसेल तर यासारखे निर्दयी सरकार नाही. या राज्यातील सरकारी शाळा, जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था जाऊन बघा, तुमच्या विकासामुळे त्यांना काय मिळत आहे?" असा थेट त्यांनी उपस्थित केला.

गडचिरोलीतील खाण उद्योगावर थेट निशाणा साधताना संजय राऊत म्हणाले, (पान ४ वर)

## तमिळनाडू विधानसभेत नीट परीक्षा रद्द करण्याचा प्रस्ताव मंजूर; भाजपाच्या एकमेव आमदाराचा सभात्याग

चेन्नई दि.११ (वृत्तसंस्था)- तमिळनाडू विधानसभेने मंगळवारी नीट अर्थात वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा रद्द करण्याच्या मागणीचा ठराव मंजूर केला. नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या वादाच्या पार्श्वभूमीवर हा ठराव मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे गेल्या महिन्यात भाजपा नेते धर्मेंद्र प्रधान यांच्या शिक्षण मंत्री पदाचा राजीनाम्याची मागणी करत कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन केलं होतं. हिंदूस्थान टाइम्सने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

सत्ताधारी टीव्हीके आणि त्यांचे मित्रपक्ष काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या डीएमके, एआयएडीएमके आणि इतर पक्षांनीही या नीटविरोधी ठरावाला पाठिंबा दिला. मात्र, भाजपाच्या एकमेव आमदाराने ठरावाच्या निषेधार्थ सभात्याग केला. राज्याचे आरोग्यमंत्री के. जी. अरुणराज यांनी हा ठराव मांडला. पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा रद्द करण्यासाठी केंद्रातील भाजपाप्रणीत सरकारने आवश्यक केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणा कराव्यात, अशी मागणी या ठरावातून करण्यात आली आहे.

"नीटमुळे विद्यार्थ्यांचं लक्ष शालेय अभ्यासक्रमापासून हटून केवळ कोचिंगकडे वळलं आहे", असा आरोप अरुणराज यांनी केला. तसंच, नीटमुळे अवाजवी शुल्क आकारणाऱ्या कोचिंग सेंटरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचंही त्यांनी सांगितलं. ग्रामीण भागातील तसंच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणाच्या संधींवर नीटचा गंभीर परिणाम होत असल्याचा दावा अरुणराज यांनी केला. तमिळनाडूमध्ये सलग सत्तेवर आलेल्या सरकारांनी नीट ही सामाजिक न्याय, समानता आणि राज्यांच्या अधिकारांच्या विरोधात असल्याची भूमिका सातत्याने मांडली आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

## मित्रासोबत हायवेवर थांबलेल्या तरुणीला डाक बंगल्यावर नेलं; ६ जणांकडून सामूहिक अत्याचार, तिघांना अटक

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्यातील महिलांवरील, तरुणींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. एकीकडे सरकार महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत गंभीर असून पोलिसांनाही तातडीने कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत. मात्र, महिलांवरील अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. आता, सामूहिक लैंगिक अत्याचाराच्या घटनेनं पालघर जिल्ह्यातील तलासरी हादरलं आहे. आपल्या मित्रासोबत दुचाकीवरुन फिरण्यासाठी गेलेल्या तरुणीवर सहा जणांकडून सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या संतापजनक घटनेनं पालघर जिल्हा हादरला आहे.

पालघरच्या तलासरी पोलीस ठाणे हद्दीतील ही घटना असून पीडित मुलीच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. मित्रासोबत महामार्गावर उभं असताना दोन बाईकवरून आलेल्या सहा जणांनी एका बंद पडलेल्या डाक बंगल्यात नेत १९ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. याप्रकरणी, (पान ४ वर)

## देशासाठी कोणतेही बलिदान न देणाऱ्यांना तिरंग्याचा पुळका येतोय, ही चांगली गोष्ट!

### तिरंगा यात्रेवरून हर्षवर्धन सपकाळांचे भाजपवर टीकास्त्र

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- "ज्यांच्या पितृ संघटनेने कधीही स्वतःच्या मुख्यालयावर तिरंगा फडकवला नाही, ज्या पक्षाने स्वातंत्र्यलढ्यात कधीही भाग घेतला नाही आणि ज्यांचे देशासाठी कोणतेही बलिदान नाही, अशांना जर आता तिरंग्याचा पुळका येत असेल, तर त्यांचे स्वागतच आहे. उशिरा का होईना, त्यांना शहाणपण सुचले आहे," अशी खरमरीत टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केली आहे. काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीसाठी मुंबईत आलेल्या सपकाळ यांनी माध्यमांशी संवाद साधताना भाजपच्या तिरंगा यात्रेवर, तसेच राज्यातील आणि देशातील विविध राजकीय मुद्द्यांवर रोखठोक मते मांडली.

राज्यात भाजप आणि महायुतीकडून काढण्यात येत असलेल्या तिरंगा यात्रा आणि मुख्यमंत्र्यांच्या सहभागावर बोलताना सपकाळ यांनी भाजपच्या इतिहासावर बोट ठेवले. ते म्हणाले, "देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांचे काहीही योगदान नाही, ते आता तिरंगा यात्रा काढत आहेत. उशिरा का होईना, देर आये दुरुस्त आये या न्यायाने हे चांगलेच आहे. पण यामागे केवळ राजकीय स्वार्थ आणि कावा नसावा, अशी आमची अपेक्षा आहे."

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेट आणि डीलिमिटेशन बिलाबाबतच्या चर्चेवर ते म्हणाले, "पंतप्रधान हे संपूर्ण देशाचे असतात. ते विशिष्ट लोकांना भेटतात आणि काहींना भेटत नाहीत, त्यामुळे (पान ४ वर)

## सीरियाचे पदच्युत अध्यक्ष बशर अल-असद यांना फाशीची शिक्षा

दमिश्क दि.११ (वृत्तसंस्था)- सीरियातील न्यायालयाने मंगळवारी पदच्युत अध्यक्ष बशर अल-असद यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे, असे वृत्त वृत्तसंस्था एएफपीने दिले आहे. सीरियन गृहयुद्धादरम्यान युद्ध गुन्हे आणि मानवतेविरुद्धचे गुन्हे या आरोपांखाली असद यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये असद पदच्युत झाले होते. सैन्याने दमास्कसला वेढा घातल्यावर असद आपल्या कुटुंबासह मॉस्कोला पळून गेले.

सीरियातील न्यायालयाने याबाबतचा निर्णय आज दिला आहे. न्यायालयाने अतेफ नजीब याला देखील मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. अतेफ नजीब दक्षिण सीरियातील राजकीय सुरक्षा विभागाचा माजी प्रमुख होता शिवाय तो असद यांचा चुलत बंधूही होता. अतेफ नजीबवर बंधीवासात असलेल्या लोकांवर अत्याचार करणे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे असे आरोप ठेवण्यात आले होते. यात अनेक लहान मुलांचा देखील समावेश होता तसेच, यामध्ये अनेकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी अतेफ याला जबाबदार धरले आहे.

## मनोज जरांगेंपुढे सरकार पायघड्या घालते; काँग्रेस नेते वडेट्टीवारांची टीका

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मनोज जरांगे यांना सरकार घाबरत असून त्यांच्यापुढे पायघड्या घालत असल्याचा गंभीर आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, "मनोज जरांगे यांना सरकार घाबरत आहे. जरांगे यांच्या चिथावणीखोर वक्तव्याबद्दल सरकार म्हणून भूमिका ठोस असायला पाहिजे, मात्र ती दिसत नाही. सरकार मनोज जरांगे यांच्यापुढे पायघड्या घालत आहे. एक दिवस उपोषणाला बसले की, चार मंत्री भेटायला जातात, त्यामुळे मनोज जरांगे यांची हिंमत वाढल्याने आता सरकारला भोगावे लागत आहे," असा थेट आरोप त्यांनी केलाय.



पुढे बोलताना विजय वडेट्टीवार यांनी म्हणाले, "मनोज जरांगे ओबीसीमध्ये यायचं म्हणतात आणि त्याच ओबीसी समाजाच्या नेत्यांना लक्ष्य करतात, ज्या प्रकारे सरकारमधील मंत्र्यांना लक्ष्य करतात. मनोज जरांगे यांना ओबीसी समाज सोडणार नाही," असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. तसेच, "ज्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले त्यांना पुरावे द्यावे लागतात, मात्र जरांगे यांचे जे वक्तव्य आहे यावरून आम्हाला त्यांच्या बुद्धीची कीव येते," अशा शब्दांत वडेट्टीवार यांनी जरांगे यांच्यावर निशाणा साधला.

दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे ओबीसींचे नेते असल्याने त्यांना मुद्दाम मनोज जरांगे यांच्याकडून लक्ष्य केले जात आहे. मनोज जरांगे यांचे चंद्रशेखर बावनकुळे यांना लक्ष्य करणे थांबले नाही, तर तेली महासंघाकडून राज्यभर आंदोलन केले जाईल, असा इशारा राष्ट्रीय तेली महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी खासदार रामदास तडस यांनी दिला आहे. "चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूलमंत्री म्हणून महसूल विभागात आमूलाग्र बदल केले. ब्रिटिशकालीन जाचक कायदे रद्द केले. हे कर्तृत्व बघता, ओबीसी नेते म्हणून त्यांना सतत लक्ष्य करत राहणे योग्य नाही," असेही रामदास तडस यावेळी म्हणाले.

## राहुल गांधींनी माझ्यावर टीका करायला सांगितलेय का?; मनोज जरागेंचा वडेट्टीवारांवर पलटवार

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच पेटले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या टीकेला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत तिखट शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. "राहुल गांधींनी तुम्हाला माझ्यावर टीका करायला सांगितलेय का?" असा थेट सवाल करत जरांगे यांनी वडेट्टीवारांवर जोरदार पलटवार केला आहे.

विजय वडेट्टीवार यांच्या टीकेचा समाचार घेताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, "अरे तुम्ही सगळे खड्ड्यात गेले ना, नीट वागा ना. काँग्रेसचे दोन-चार जणांमुळे थोडेफार बरे चालले आहे. अमित देशमुख साहेब, बाळासाहेब थोरात साहेब, चव्हाण साहेब, हर्षवर्धन सपकाळ साहेब आणि नाना पटोले साहेब यांच्यामुळे बरं चाललं आहे. तुम्ही कशाला हा सगळा खेळ विस्कटता?," असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, "त्या राहुल गांधींनी हेच सांगितलं आहे का की मराठ्यांच्या विरोधात बोला. काँग्रेस आता बोटावर मोजण्या इतकी सुद्धा राहिली नाही. काँग्रेसला कशाला खड्ड्यात घालत आहात. नीट राहा ना. तुम्ही कितीही बोलला तरी मी आरक्षण घेणारच आहे. तुम्ही काँग्रेस कशाला संपवता, असा पलटवार मनोज जरांगे पाटील यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर केलाय.

# गटार नव्हे; गता-हार!

**आपल्या** सणांना बदनाम करायचे काम आपणच नेहमी करत असतो. आपल्याकडे आषाढी अमावस्या नंतर आहारात बदल केला जातो. या दिवसाला गताहारी (जो आहार गेला आहे ती ) अमावस्या म्हणतात.

**गटारी नव्हे गताहारी**

गटर हा इंग्रजी शब्द आहे. अशुध्द जलसंवहन यंत्रणेसाठीचा हा इंग्रजी प्रतिशब्द. इंग्रजांच्या काळात या शब्दाशी भारताचा परिचय झाला. भारतीय सण हे नेहमीच पावित्र्याचं अधिष्ठान असलेले आहेत. तसेच स्थल काल व परिस्थिती यांच्याशी त्यांचा प्रगाढ संबंध आहे.

आषाढ हा पूर्वी विशेष करुन तीव्र वर्षावाचा कालावधी असे. पावसामुळे अंधारलेपण व अन्न अनुपलब्धता हा मोठा अडचणीचा भाग असे. श्रावण सुरू होण्यापूर्वी व नंतरही श्रावणात कित्येकदा ऊपोषणाची स्थिती असे. शिवाय पावसाळी पाण्याने रोगराई पसरण्याच्या शक्यता टाळण्यासाठी ऊपोषणाचा वैद्यकीय सल्ला धार्मिक आधार देऊन चार महिन्या साठी लागू केला गेला. (चातुर्मास)

**ऊपोषण म्हणजे गताहार –** गत म्हणजे गेलेला आहार म्हणजे जेवण. तर असा हा गताहार प्रारंभ आषाढी अमावस्येपासून होतो. म्हणून गताहारी अमावस्या. आपल्या प्रत्येक सणांचे नावे संस्कृतवर आधारित आहेत. उटूी हा इंग्रजी शब्द आपल्या सणाला खोडसाळ पणे जोडलेला आहे. आपली लायकी गटारात लोळायची आहे असे आपल्याला हिणवले गेले व दुर्दैव हे की आपण ते खरे ठरवण्याच्या मागे लागलोय.

आपल्या महान संस्कृतीची जाणीव ठेवा. आपल्या प्रत्येक सणाला मोठा अर्थ आहे. आपल्या सणांची बरोबरी कुणीही करू शकत नाहीं. आपले सण फक्त आपण आपल्या खऱ्या संस्कृतीने साजरे करू या आणि जाणीवपूर्वक केल्या जार्णाया अपभ्रंशाने होणारा ऱ्हास थांबवूया.

**गटार नव्हे, गताहार**

गत– मागील, जुने, गेलेले, आता नाहीं ते
आहार–भोजन
गत–आहार–गताहार
जसे:– शाक–आहारी –शाकाहारी
तसे:–गत–आहारी –गताहारी
गत–आहारी– अमावस्या –गताहारी अमावस्या
या दिवशी दीपपूजन करतात.

गुरुवारी २४ जुलै २०२५ रोजी दीप अमावस्या आहे. हिंदूंच्या सर्वाधिक कुचेष्टेचे, विकृत विनोदांचे जे सण आहेत. त्यात वटपौर्णिमेनंतर दीप अमावस्या हा सण येतो.

व्यक्तिगत पातळीवर गटारी साजरी करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. पण दीप पूजे ऐवजी केवळ गटारी म्हणून याला सर्वत्र कुप्रसिद्धी मिळू नये असे वाटते. जो आपला सणच नाहीये त्यासाठी आपण आपला धर्म, आपली संस्कृती का म्हणून बदनाम करायची ? उलट महाराष्ट्रातील सर्व जातींच्या लाखो घरांमध्ये मोठ्या भक्तिभावाने या दिवशी दीपपूजन केले जाते.

त्यामुळे अशी आपलीच मानहानी टाळण्यासाठी गटारी हा शब्द वापरू नका ही विनंती आम्ही अनेकांना करीत असतो. तसेच दारूच्या बाटल्या, कोंबड्या, बोकड यांची चित्रे शुभेच्छा म्हणून एकमेकांना पाठविणे, Happy Gatari म्हणून Wish करणे या वाईट गोष्टी आपण कटाक्षाने टाळाव्यात.

हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आपल्या धर्मात याच्या मागचे विज्ञानही सामावलेले आहेच. पूर्वी या दिवशी मांसाहार करून गौरींच्या जेवणापर्यंत मांसाहार बंद ठेवला जात असे. किमान या पावसाळी दिवसांमध्ये मांसाहार बंद ठेवण्याची तीव्र गरज आणि आपली प्रथा किती दूरदर्शीपणे आपल्या पूर्वजांनी योजली आहे हे यावर्षी प्रकर्षाने अधोरेखित होते आहे.

१) या ओलसर पावसाळी वातावरणात मांसाहार नीट पचत नाही.

२) बहुतेक प्राण्यांचा हा काळ म्हणजे विणीचा / प्रजननाचा काळ असतो. याच काळात प्राण्यांची हत्या केली तर नवीन प्राणी जन्मालाच येणार नाहीत. मग वर्षभर खायला प्राणी मिळणार कुठून ? याचा सर्या निसर्गचक्रावरच विपरीत परिणाम होतो. त्यामुळे निसर्गपुत्र कोळीबांधव या काळात मासेमारी करीत नाहीत आणि सरकारी पातळीवरूनही मासेमारीवर बंदी घालण्यात येते.

३) या दिवसात बाहेरच्या दमट वातावरणामुळे प्राण्यांच्या शरीराच्या आत आणि शरीरावरील त्वचेवर अनेक घातक जीवजंतू असण्याची शक्यता असते. शिजविताना त्यांचा पूर्ण नाश न झाल्यास त्याचाही खाणाऱ्याला त्रास होऊ शकतो.

४) वातावरणात ओलावा असतो. मांस किंवा मासे नीट न ठेवल्यास ते हवेतील वाढलेल्या जंतूंमुळे कुजण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होते.

५) आज विविध लसी, अत्यंत परिणामकारक प्रतिजैविके, औषधे उपलब्ध असूनसुद्धा, धुमाकूळ घालर्णाया विविध साथीना आवर घालणे कठीण झाले आहे. अनेक घातक रोगांच्या जीवघेण्या साथी, ह्या अस्वच्छ प्राण्यांच्या शरीरावर वाढर्णाया जंतुंमुळे पसरतात. म्हणून या दिवसात मांसाहार टाळल्यास जंतू संसर्गाचा धोका कमी होतो. अशा सर्व कारणांमुळे या दिवसाला धार्मिक जोड दिली गेली आहे. त्यामुळे आपोआपच निसर्गाचा तोल साधला जातो. या दिवसात शाकाहार करण्यामागेही शास्त्रीय कारणे आहेतच.

१ ) अत्यंत दुमिर्ळ आणि प्रकृतीला पोषक अशा अनेक भाज्या याच काळात उगवतात. संपूर्ण वर्षभरात या भाज्या पुन्हा पाहायलाही मिळत नाहीत.

२) शाकाहार केल्यामुळे अशा भाज्या आपोआपच खाल्लूया जातात.

३) तुलनेने शाकाहाराचे या दिवसात नीट पचन होते.

४) विविध उपासांच्या दिवशी खाल्लूया जाणाऱ्या कंदमुळांच्या आहारामुळे त्यातील अनेक दुर्मिळ खनिजे आणि उपयुक्त पोषक घटक अपोआप शरीराला लाभतात.

५) कायम मांसाहार करर्णायांच्या पचन संस्थेवर नेहेमी येणारा ताण, या शाकाहारी बदलामुळे कांही काळ कमी होतो. म्हणून विनंती करतो 'श्रावण जरूर पाळा, गटारीची कुप्रसिद्धी टाळा'

# आषाढ अमावस्या - धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व

**आषाढ** अमावस्या ही हिंदू पंचांगातील एक महत्त्वाची तिथी आहे. आषाढ महिन्याच्या कृष्ण पक्षातील शेवटचा दिवस म्हणजेच अमावस्या. ह्या दिवशी धार्मिकदृष्ट्या अनेक पूजाविधी, श्राद्धकर्मे आणि पितृतर्पण केले जाते. हा दिवस विशेषतः 'पितृ पूजन' आणि 'दत्त पूजा'साठी ओळखला जातो. काही ठिकाणी या दिवशी 'गुरुपौर्णिमा'ची तयारीसुद्धा सुरू होते.



**आषाढ अमावस्येचे महत्त्व: पितृ तर्पणासाठी शुभ दिवस:**

या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांना पाणी, अन्न अर्पण करणे हे अत्यंत पुण्यकारक मानले जाते. विशेषतः गंगाजळीत स्नान करून पितरांना तर्पण दिल्यास त्यांच्या आत्म्याला शांती लाभते, असा विश्वास आहे.

**दत्तपूजा व ब्रह्मा पूजन:**

काही भागांमध्ये या दिवशी भगवान दत्तात्रेयाची पूजा केली जाते. पवित्र स्थळी स्नान करून साधना व मंत्रजप करणे महत्त्वाचे मानले जाते.

**नदीस्नानाचे महत्त्व:**

आषाढ अमावस्येच्या दिवशी गंगा, गोदावरी, कृष्णा, नर्मदा इत्यादी नद्यांमध्ये स्नान करणे पुण्यप्रद मानले जाते. यामुळे शारीरिक व मानसिक शुद्धी होते, असा श्रद्धाळूंचा विश्वास असतो.

**झाडे लावण्याची परंपरा:**

काही भागांमध्ये या दिवशी वृक्षारोपण देखील केले जाते. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने याला विशेष महत्त्व आहे.

**शेतकऱ्यांसाठी शुभ दिवस:**

आषाढ अमावस्या ही पावसाळ्याच्या सुरुवातीची वेळ असते. त्यामुळे शेतकरी या दिवसापासून शेतीची तयारी करतात. नवे बियाणे पेरण्यास ही वेळ शुभ मानली जाते.

**निष्कर्ष:**

आषाढ अमावस्या ही एक धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची तिथी आहे. श्रद्धा, भक्ती आणि पर्यावरणपूरक कार्याची सांगड घालणारी ही तिथी भारतीय परंपरेतील एक अनमोल पर्व आहे. आषाढ अमावस्येचे वैकल्पिक स्वरूप व माहिती

**१. ज्योतिषशास्त्रानुसार महत्त्व:**

आषाढ अमावस्या ही चंद्राचा पूर्णतः अभाव असलेली रात्र असते. अशा रात्रीला मानसिक स्थैर्य, ध्यान, आणि साधनेसाठी अनुकूल मानले जाते. कालभैरव, महाकाळ आणि अन्य तांत्रिक देवतांची उपासना करण्यासाठी ही रात्र उपयुक्त मानली जाते.

**२. तांत्रिक साधनेसाठी विशेष दिवस:**

तांत्रिक मार्गातील साधकांसाठी आषाढ अमावस्या ही एक महत्त्वाची रात्र असते. या रात्री विशेष मंत्रसिद्धी, यंत्रपूजन, आणि शक्तिपूजा केली जाते. काही तांत्रिक परंपरांमध्ये या दिवशी 'काली साधना' केली जाते.

**३. प्रादेशिक परंपरा आणि लोककथा:**

कोकण व गोवा: येथे आषाढ अमावस्येला 'वट अमावस्या' म्हणूनही ओळखले जाते. स्त्रिया वटवृक्षाची पूजा करून अखंड सौभाग्याची प्रार्थना करतात.

ओडिशा व बंगाल: येथे या अमावस्येला विशेष 'शक्तीपीठां'मध्ये देवीची पूजा केली जाते.

महाराष्ट्रात: काही ठिकाणी 'भूतामावस्या' म्हणूनही याचा उल्लेख आढळतो. या दिवशी घरातील व देव्हाऱ्यातील निगेटिव्ह ऊर्जा दूर करण्यासाठी धूप, दिवा, गंध वापरून विशेष शुद्धीकरण केले जाते.

**४. पर्यावरणाशी नातं:**

या काळात जमिनीत ओलावा वाढलेला असतो. त्यामुळे ही वेळ झाडे लावण्यासाठी अत्यंत योग्य मानली जाते. अनेक संस्थांकडून वृक्षारोपणाचे उपक्रम या दिवशी राबवले जातात.

**५. गुरुच्या प्रती गुरुपूजा सुरूवात:**

ज्या दिवशी आषाढ अमावस्या येते, त्यानंतर काही दिवसांनी गुरुपौर्णिमा येते. त्यामुळे आषाढ अमावस्येला गुरूंचे ध्यान, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास सुरुवात केली जाते.

**थोडक्यात विशेष वैशिष्ट्ये:**

| घटक | महत्त्व – |
|---|---|
| चंद्रगती | चंद्राचा पूर्ण अभाव – ध्यानसाधनेसाठी योग्य. |
| धार्मिक उपयोग | पितृ तर्पण, काली/दत्त साधना. |
| प्रादेशिक परंपरा | वट अमावस्या, भूत अमावस्या. |
| निसर्ग पूजन | वृक्षारोपण, नदीस्नान. |
| मानसिक शांती | ध्यान, जप, तप. |

### आषाढ अमावस्या २०२५ – महत्त्व, पूजा विधी आणि उपाय

- तारीख आणि तिथी (२०२५):
- तारीख: २५ जून २०२५ (बुधवार)
- अमावस्येची तिथी सुरू : २४ जून सायंकाळी ६:५९ पासून.
- अमावस्येची समाप्ती : २५ जून दुपारी ४:०० पर्यंत.
- आषाढ अमावस्येचे धार्मिक महत्त्व: आषाढ महिन्यातील अमावस्या पितृ तर्पण, पिंडदान, दानधर्म, व्रत आणि तीर्थस्नानासाठी अत्यंत शुभ मानली जाते.
- या दिवशी पूर्वजांना जलदान, तर्पण करून पितृदोष निवारण होते असे मानले जाते.

शनि दोष, कालसर्प दोष, व अन्य ग्रहबाधांपासून मुक्ती मिळवण्यासाठी विशेष पूजाविधी केल्या जातात.

**पूजा व उपाय (काय करावं):**

- ब्रह्म मुहूर्तात उठून गंगास्नान किंवा तीर्थस्नान करणे (घरच्या घरी पवित्र पाण्याने स्नान करता येते).
- पूर्वजांसाठी तर्पण व पिंडदान करणे.

पीपळ वृक्षाखाली दिवा लावणे व सात फेऱ्या मारणे.

- कावळा, गायी, कुत्रा, मुंग्या व गरजू व्यक्तींना अन्न दान करणे.
- 'ॐ पितृभ्यः स्वधा नमः' या मंत्राचा जप करणे. शुद्ध सात्त्विक आहार, व्रत आणि मौन पाळणे.
- **काय टाळावं (निषेध):**

या दिवशी मांसाहार, मद्यपान, तंबाखू व अनैतिक वर्तन टाळा. घरगुती वाद, अपशब्द, तक्रारी किंवा कोणत्याही वाईट कृत्यांपासून दूर रहा.

- सर्व कार्ये स्थगित ठेवा – नवीन व्यापार, गृहप्रवेश किंवा शुभ कार्य सुरू करणे टाळा.
- **विशेष धार्मिक उपाय:** पीपळ वृक्षाला पाणी घालून गंध, फुलं अर्पण करा, नेमाने ७ किंवा ११ दिवे लावा, गुरु ब्रह्मा, गुरु विष्णु... गुरु मंत्राचा जप करा, 'पितृ गायत्री मंत्र' चा जप:

ॐ सर्वपितृदेवाय विद्महे, जगतधारिण्ये धीमहि,
तन्नो पितृ प्रचोदयातब

- शुभ वेळा (मुहूर्त): ब्रह्म मुहूर्त: सकाळी ४:०५ ते ४:४५

विजय मुहूर्त: दुपारी २:४३ ते ३:३९
गोधूळी मुहूर्त: सायंकाळी ७:२० च्या सुमारास
अमृत काल: रात्री ११:३४ ते १:०२ (२५ जून ते २६ जून)

- उपसंहार : आषाढ अमावस्या ही आपल्या पूर्वजांची आठवण करून देणारी व त्यांना शांतता देणारी एक महत्त्वाची तिथी आहे. यानिमित्ताने योग्य पद्धतीने तर्पण, पिंडदान, दान व जप केल्यास घरातील पितृदोष दूर होतो, शांती व समृद्धी प्राप्त होते.

# कष्टात परमेश्वरांचे अस्तित्व मानणारे-संत सावता

'कांदा, मुळा, भाजी! अवघी विठाई माझी, लसून, मिरच्या, कोथंबिरी! अवघा झाला माझा हरी मोट, नाडा, विहीर, दोरी! अवघी व्यापिली पंढरी सावत्याने केला मळा! विठ्ठल पायी गोविला गळा.

उपरोक्त अभंग गाऊन कष्टात परमेश्वरांचे अस्तित्व मानणारे संत शिरोमणी सावता महाराज हे महाराष्ट्रातील सर्वश्रेष्ठ संत होऊन गेले. संत सावता महाराज कर्म व कष्टातच देवाचे अस्तित्व मानत.संत सावता महाराजांनी आपल्या शेती कामातून व शेती

अवजारातून त्यांनी ईश्वराची अनुभूती घेतली. त्यांचे मानणे होते की, ईश्वराला भेटण्यासाठी कोणत्याही धार्मिक स्थळी किंवा मंदिरात जाण्याची गरज नाही,कारण आपण जे विधायक व रचनात्म कार्य करतो, जे शुद्ध भावाने कार्य करतो हे कार्य म्हणजेच ईश्वर आहे. संत सावता महाराजांनी भक्तीचा पारंपारिक मार्ग त्यागून त्यांनी कर्मातून ईश्वर चिंतन व कर्तव्यातून ईश्वर भक्ती हा मार्ग अवलंबला. सावता महाराजांनी शेती व्यवसायाला प्राधान्य दिले. त्यांनी शेतीच्या प्रत्येक कृतीतून तसेच प्रत्येक अवजारातून ईश्वर भक्तीचा तसेच ईश्वर नामोकच्चारांचा ध्यास धरला होता. त्यांना शेतीच्या प्रत्येक कामात ईश्वराचे दर्शन होत असे.संत शिरोमणी संत सावता महाराज शेतीच्या प्रत्येक कामात ईश्वराचे चिंतन करीत असत.

त्यांना सदैव भास असायचा की, माझ्या मळ्याचा माळी विठ्ठलच आहे. मळ्यातील ही हिरवी रोपे म्हणजे विठ्ठलाची देणगी होय. एक बी रोपाव आणि पाटी, पाटी ने पदरात पडाव ही ईश्वराचीच लीला आहे.माझ्या विहिरीला ईश्वराच्या कृपेनेच अमृताचे झरे फुटले आहेत असे त्यांचे मानणे होते.

तत्कालीन समाज हा व्रत–वैकल्ये, यज्ञ–यागादी अशा कर्म कांडातच आयुष्य वेचीत होता. अशा या समाजाला संत सावता महाराजांनी 'कर्म हेच सर्वश्रेष्ठ आहे'अशी शिकवण देऊन परमेश्वराचे अस्तित्व कष्टात आहे हा उपदेश केला, अशा महान संताच्या स्मृतींना कोटी! कोटी!! प्रणाम.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# गटारी नव्हे, ही तर दीप अमावस्या...

**आपल्या** कालणगणेत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा धार्मिक आणि सणांचा महिना म्हणून ओळखला जातो. या काळात वातावरणाचाही नूर पालटतो. त्यामुळेच तर या काळात बरसणाऱ्या पावसाला श्रावणसरी म्हणतात. देवशयनी एकादशी झाल्यानंतर हा धार्मिक महिना येतो. हा सणाची सुरुवात म्हणजे दर्श अमावस्या. सध्या या दीप उत्सवाचा गटारी अमावस्या असा विपर्यास झाला आहे. मात्र दीप पूजन करण्याचा हा दिवस मानला जातो.

इंग्रजी कालगणनेतील जुलै आणि ऑगस्ट हे महिने जुलियन सीझर आणि ऑगस्टसब या राजांच्या नावावरून आल्याचे अनेकांना माहिती असते. मात्र, आपल्या बारा महिन्यांची नावे आणि त्याचा इतिहास कमी जणांना माहिती असतो. आपली कालगणना चांद्रवर्ष आणि सूर्यवर्ष यांचा मेळ साधत बनवली जाते. ही कालगणना खगोलशास्त्र आणि ग्रहताऱ्यांच्या गतीद्वारे पंचागात केली जाते. तिथी, वार, नक्षत्र, योग आणि करण ही पंचागांची महत्त्वाची पाचे अंगे आहेत. यावरून शुभ दिवस आणि कोणत्यावेळी कोणते कार्य करावे, याचा निर्णय घेण्यात येतो.

या महिन्यात अनेक धार्मिक अनुष्ठाने व्रत, वैकल्ये केली जातात. धार्मिक दृष्टीने अंत्यत महत्त्वाच्या असलेल्या या महिन्याला श्रावण असे नाव का पडले असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. याची कथा रामायणाशी निगडीत आहे. श्रीरामाचे वडील दशरथ शिकारीसाठी जंगलात गेले असता, अनवधानाने त्यांच्या हातून श्रावण या मातापिता भक्त असलेल्या मुलाची हत्या होते. आपल्या आई–वडिलांची तहान भागवण्यासाठी श्रावण बाळ नदीवर पाणी आणण्यासाठी जातो. त्यावेळी पाणवठ्याजवळ कोणी प्राणी आला असावा, असा दशरथ राजाचा समज होतो आणि ते बाण सोडतात. तो बाण वर्मी लागल्याने श्रावण बाळ जागीच कोसळतो. राजा दशरथाला आपली चूक समजते आणि तो श्रावण बाळाजवळ जातो. त्यावेळी माझ्या तहानलेल्या आई–वडिलांना पाणी द्या, अशी विनंती श्रावण बाळ करतो.

दशरथ राजा श्रावणच्या मात्यापित्यांजवळ जात घडलेली घटना सांगत त्यांची माफी मागतो आणि त्यांना पाणी पिण्याची विनंती करतो. मात्र, पुत्रवियोगाने उद्विग्न झालेले श्रावणबाळाचे आईवडील राजा दशरथ याला तुझा मृत्यूही पुत्रवियोगाने होईल, असा शाप देत प्राण सोडतात. मातापिता भक्त असलेल्या श्रावण बाळामुळे या धार्मिक महिन्याला श्रावण असे नाव मिळाल्याची आख्यायिका आहे.

आपल्या संस्कृतीत माता, पिता आणि गुरुंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मातापित्यांची सेवा करणाऱ्या पुंडलिकाने श्रीकृष्णाला विटेवर उभे केले. तसेच श्रीकृष्णही आपल्या लाडक्या भक्तासाठी विठ्ठलाच्या रुपात युगे अठ्ठावीस विटेवर उभा आहे, मातापिता भक्तीच्या अशा अनेक कथा आहेत. तसेच गुरुशिष्य परंपरेच्याही अनेक कथा सांगण्यात येतात. त्यामुळे या महिन्याला श्रावण नाव मिळाले आहे.

श्रावणमास सुरु होतो, तो दीप अमावस्येने. या दिवशी घरातील सर्व दिवे स्वच्छ करून त्यांची पूजा करण्यात येते. पुर्वीच्या काळी इलेक्ट्रिसिटी आणि बल्बचा शोध लागण्यापूर्वी दिव्यांचा वापर करण्यात येत होता.

वर्षभर प्रकाश देणाऱ्या दिव्यांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिव्यांची आरास करत दीपपूजा करण्यात येते. तसेच अनेकजण श्रावण महिन्यात फक्त शाकाहार करत व्रतवैकल्ये करत असल्याने मासांहार वर्ज्य करतात. त्यामुळे श्रावण महिना सुरु होण्यापूर्वी अनेकजण मासांहार करतात आणि महिनाभर शाकाहार पाळतात. मात्र, सध्या या दिवशी मासांहारसोबत मद्यपानही करण्यात येते. त्यामुळे दिव्यांचा या सणाचा गटारी असा विपर्यास झाला आहे.

या महिन्यात अनेक सण, उत्सव, व्रतवैकल्ये येत असल्याने तसेच निसर्गही या काळात चांगले, प्रसन्न वातावरण निर्माण करत असल्याने आपण या धार्मिक महिन्याचा आनंद घेऊया. खऱ्या अर्थाने श्रावणमासी हर्ष मानसी...हा अनुभव आपण घेऊया. तसेच हा दिवस म्हणजे गटारी नसून दीप अमावस्या म्हणून साजरी करत त्याचे महत्त्वा जाणून घेण्याची गरज आहे.

### कर्मयोगी; संत सावता महाराज

संत सावता महाराज
कर्माचे सर्वश्रेष्ठ पुजारी
कर्मावरच त्यांची
श्रद्धा असे भारी
कर्म व कष्टातच असते
अस्तित्व परमेश्वरांचे
सावंतांची शिकवण
कष्ट असावे परिश्रमाचे
सावंतांना ईश्वराची असे
अनुभूती शेती अवजारात
ईश्वराच्या भेटीची असे
आस शेती कामात
सावंतांचे प्राधान्य
असे शेती व्यवसायाला
कष्ट करतांना शेतात
नमन करा ईश्वराला
कांदा,मुळा आणि भाजी
लसून,मिरच्या कोथंबिरी
यातील कष्टातून दिसे
विठ्ठल आणि हरी
सावता महाराजांची
महान असे शेती कीर्ती
यातूनच शेतकऱ्यांना
ईश्वर देतो स्फूर्ती
शेती कष्टातून ईश्वराचे
दर्शन सावतांना झाले
शेतकरी बांधवानो
शेती कार्य श्रेष्ठ झाले

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# अन्नाची ॲलर्जी : असहिष्णुता की संवेदनशीलता?

अनेकांना एखादा अन्नपदार्थ खाल्लूयानंतर शिंका येणे, श्वास घेताना घरघर होणे, अंगावर पुरळ उठणे, पोट फुगणे, जुलाब, मळमळ, सांधेदुखी किंवा थकवा यांसारखी लक्षणे जाणवतात. अशा वेळी बहुतेक जण त्याला 'अन्न ॲलर्जी' समजतात. मात्र प्रत्येक वेळी ती ॲलर्जीच असेल असे नाही. काही वेळा ही अन्न असहिष्णुता, अन्न संवेदनशीलता किंवा सेलिअक रोगाची लक्षणे असू शकतात. या स्थितींचे स्वरूप आणि उपचार वेगवेगळे असल्याने त्यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. अन्न असहिष्णुता अन्न असहिष्णुता म्हणजे शरीराला विशिष्ट अन्नपदार्थ नीट पचवता किंवा त्यावर प्रक्रिया करता न येणे. याचे सर्वाधिक परिचित उदाहरण म्हणजे लॅक्टोज असहिष्णुता. वय वाढत गेल्यानंतर अनेकांच्या शरीरात लॅक्टोज पचवण्यासाठी आवश्यक असलेले लॅक्टेज हे एन्झाइम कमी प्रमाणात तयार होते. त्यामुळे दुधातील लॅक्टोज पूर्णपणे पचत नाही आणि पोट फुगणे, गॅस, पोटदुखी किंवा जुलाब यांसारख्या तक्रारी निर्माण होतात. संशोधनानुसार, जगातील केवळ सुमारे ३५ टक्के लोकच बालपणानंतरही लॅक्टोज सहज पचवू शकतात. लॅक्टोज असहिष्णुता जीवघेणी नसली, तरी ती दैनंदिन जीवनात मोठा त्रास देऊ शकते. दुग्धजन्य पदार्थ कमी करणे किंवा टाळणे, तसेच डॉक्टरांच्या सल्लूयाने लॅक्टेज एन्झाइमची पूरक औषधे घेणे उपयुक्त ठरू शकते.

अन्न ॲलर्जी अन्न ॲलर्जी ही रोगप्रतिकारक शक्तीची अतितीव्र प्रतिक्रिया असते. शरीर एखाद्या निरुपद्रवी अन्नपदार्थालाही धोकादायक समजून त्याविरुद्ध प्रतिक्रिया देते. शेंगदाणे, समुद्री खाद्यपदार्थ, अंडी, दूध किंवा इतर काही अन्नपदार्थांमुळे काही व्यक्तींना श्वास घेण्यास त्रास, चेहरा किंवा घसा सुजणे, रक्तदाब अचानक कमी होणे किंवा ॲनाफिलॅक्सिससारखी जीवघेणी अवस्था निर्माण होऊ शकते.

अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार आवश्यक असतात. अन्न ॲलर्जी केवळ लहान मुलांनाच होते असे नाही. ती कोणत्याही वयात, अगदी प्रौढावस्थेतही प्रथमच उद्भवू शकते. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अन्न संवेदनशीलता अन्न संवेदनशीलता ही अधिकृत वैद्यकीय निदानाची संज्ञा नसली, तरी अनेक तज्ज्ञांच्या मते ती खसऋ–मध्यस्थ रोगप्रतिकारक प्रतिसादाशी संबंधित असू शकते. मात्र याविषयी अद्याप एकमत नाही. या स्थितीत लक्षणे लगेच दिसतीलच असे नाही. ती काही तासांनी किंवा काही दिवसांनीही जाणवू शकतात.

# दिप अमावस्या: समज गैरसमज

जसे माणसाचे शरीर हे पंचतत्वानी बनलेले आहे तसेच इतर सजीव– निर्जीव पदार्थ ही पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या पंचतत्व निर्माण झालेले आहेत. या पंचतत्त्वात अग्नी तत्त्वाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अग्नी हे आपल्या प्रकाशाने अंधकाराचा नाश करते म्हणजे अज्ञान दूर करून सत्याचे ज्ञान करून देते. अशा या अग्नीतत्वाचे प्रतीक म्हणजे दिव्याची ज्योत जी अंधकारात आम्हाला प्रकाशाचा किरण देते अशा या अग्नीच्या प्रति, ज्योतीच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे आषाढ अमावस्या होय जिला दीप अमावस्या असे ही म्हणतात. ज्यात आम्ही दिव्याची पूजा करतो. एका अर्थाने अग्नीतत्वाची ती पूजा होय. दिव्याची साधना अखंड चालू असते स्वतः जळून इतरांना प्रकाश देणारा दिवा म्हणजे एक मोठा सामाजिक संदेश होय. अशा या पवित्र दिनाला आज एक विकृत रूप समाजात नकळत येत चाललेले दिसते ते म्हणजे काही विकृत लोक याला गटारी अमावस्या असे संबोधून या पवित्र दिनाचा अपमान करतात.



या अमावस्येच्या दुर्सया दिवशी श्रावण मास चालू होतो. हिंदू धर्मातील श्रावण मास हा पवित्र मास मानला जातो त्यामुळे असंख्य जण या काळात शाकाहारच घेतात. मांसाहार वर्ज्य करतात पुढे महिनाभर वा चार महिने चातुर्मासात मांसाहार करायचा नाही यामुळे त्यादिवशी मद्य आणि मांसाहार यांचे सेवन काहीजण करतात ही कुप्रथा मोठ्या प्रमाणात वाढताना आज आम्हाला दिसत आहे. व्हाट्सअप व फेसबुक वरून याचे उदात्तीकरण करून चुकीचा संदेश समाजात जाताना आज आम्हाला दिसून येतो. अशा चुकीच्या प्रथांची ज्याला कुठलेही धार्मिक, आध्यात्मिक वा सामाजिक कारण व महत्त्व नाही अशा चुकीच्या प्रथांचे उदात्तीकरण झाल्याने आम्ही आमच्या हाताने पुढच्या पिढीला या कूप्रथेत ढकलतो आहोत.

कुठल्याही दिवशी मद्य सेवन करण्याचे समर्थन होऊच शकत नाही मग ते गटारी अमावस्येला योग्य कसे असू शकते? आज जगाला शाकाहाराचे महत्त्व पटलेले असताना आम्ही काही दिवसांसाठी मांसाहार वर्ज्य करायचा म्हणून त्या दिवशी त्याचे सेवन करणे कसे काय समर्थनीय असू शकते. बाहेरच्या वातावरणामुळे प्राण्यांच्या शरीरात आणि शरीरावर अनेक घातक जीवाणू जीवजंतू असण्याची शक्यता असते ते खाण्याने त्रास होऊ शकतो. या काळातील वातावरणामुळे पचनशक्ती जड झालेली असते. अशावेळी मांसाहार पचत नाही त्यामुळे चातुर्मासात शाकाहार व उपवास याचे महत्त्व सांगितले आहे, ज्याला आरोग्याच्या दृष्टीने खूपच महत्त्व आहे हे सोडून आम्ही चुकीच्या गोष्टी समाजात पसरवतो व इतरांनी पसरविलेल्या या चुकांवर गप्प बसणे म्हणजे त्याचे समर्थनच करण्यासारखे होय. अशा कूप्रथेत अडकर्णाया आमच्या पुढच्या पिढीच्या भवितव्याची जबाबदारी कुणाची हा प्रश्न आज सर्वांना पडणे गरजेचे आहे असे वाटते.

**– डॉ. पी. एस. महाजन**

# रेल्वे स्थानक परिसरात ६० वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृत्यू; ओळख पटविण्याचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – रेल्वे पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे ए.डी. क्र. २४/२०२६, कलम १९४ BN55 अन्वये एका अनोळखी पुरुषाच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या पुरुषाचे वय अंदाजे ६० वर्षे असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित पुरुषाची उंची अंदाजे ५ फूट ७ इंच, अंगाने मध्यम, चेहरा गोरा, नाक सरळ, केस पांढरे व मिशी बारीक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्याच्याबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

या अनोळखी पुरुषाची ओळख पटविण्यासाठी त्याचे नाव, गाव व वास्तव्याची माहिती असलेल्या नागरिकांनी रेल्वे पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर, तपासी अंमलदार पो. हवा/२२९ ए. व्ही. राठोड लोहमार्ग पोलीस ठाणे. छत्रपती संभाजीनगर मो.नं. ८०८००२१२६५ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त म.न.पा. शाळांमध्ये महिला कीर्तनकारांचा राष्ट्रीय सप्ताह



छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये व सामाजिक बांधिलकी रुजविण्याच्या उद्देशाने 'देव, देश, धर्म – समाज प्रबोधन ग्रुप' यांच्या वतीने शहरातील म.न.पा. शाळांमध्ये राष्ट्रीय कीर्तन सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

म.न.पा.आयुक्त अमोल येडगे यांच्या प्रेरणेने शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली म.न.पा. शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. यासाठी शिक्षणाधिकारी भरत तीनगोटे , प्रशासन अधिकारी संजीव सोनार, विस्तार अधिकारी रईसा बेगम ,विजय कोल्हे आणि कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे आणि सर्व केंद्रीय मुख्याध्यापक यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करीत आहे.

या उपक्रमांतर्गत दि. ७ ऑगस्ट रोजी मुकुंदवाडी शाळेत ह.भ.प. सौ. मंजुषा लक्करस, दि. ८ ऑगस्ट रोजी प्रियदर्शिनी मनपा शाळेत ह.भ.प. सौ. मंजुषा लक्करस, दि. १० ऑगस्ट रोजी चिकलठाणा मनपा शाळेत ह.भ.प. सौ. प्रिती जोशी, दि. ११ ऑगस्ट रोजी विटखेडा मनपा शाळेत ह.भ.प. सौ. सुलभा केतकर, दि. १२ ऑगस्ट रोजी एन-७ मनपा शाळेत ह.भ.प. सौ. स्वाती पंडे आणि दि. १३ ऑगस्ट रोजी हर्सूल मनपा शाळेत ह.भ.प. सौ. द्वाती खडके या राष्ट्रीय कीर्तनाद्वारे विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती, संतपरंपरा, भारतीय संस्कृती आणि सामाजिक जाणीवेचा संदेश देणार आहेत. राष्ट्रीय कीर्तन सप्ताह ही संकल्पना मीना तांबोळी आणि सुजाता केतकर यांची असून या उपक्रमासाठी कार्यकारी सदस्या नंदिनी पोळ, वर्षा ब्रह्मपुरकर,तेजस्विनी कुलकर्णी यांचेसह सर्व सदस्या यासाठी मेहनत घेत आहे. कीर्तनासाठी मृदंगावर संचालक दिनेश डोळे हे करीत असून तबल्यावर त्यांना श्रीनिवास कुलकर्णी यांची साथ लाभत आहे.

# छत्रपती संभाजीनगरच्या चार हवालदारांचा राज्यस्तरीय सन्मान

## उल्लेखनीय सेवेसाठी सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान




छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागात उल्लेखनीय सेवा बजावल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहातील चार हवालदारांचा राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला. हवालदार संजय रावसाहेब खेडकर, नारायण सोनवणे, अंबरसिंग कारभारी नागलोत तसेच सेवानिवृत्त हवालदार बाबासाहेब गायकवाड यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

येरवडा (पुणे) येथील कारागृह कर्मचारी भवनात ५ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय समारंभात कारागृह व सुधार सेवा विभागाचे अपर पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक सुहास वारके यांच्या हस्ते संबंधित कर्मचाऱ्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांच्या सन्मानासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करून आवश्यक पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर या चारही हवालदारांची राज्यस्तरीय सन्मानासाठी निवड करण्यात आली होती.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध कारागृहांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण २८ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहातील चार हवालदारांचा समावेश असल्याने कारागृहाच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# शेतीनिष्ठ शेतकरी आप्पासाहेब रामकृष्ण पाटील यांना 'चिंतातुर शेतकरी' काव्य संग्रह भेट




वैजापूर, दि. ११ (प्रतिनिधी) – शेतकऱ्यांच्या व्यथा,समस्स्या, प्रश्न, अडचणी, अडवणूक शेती माल भाव, शासनाचे शेती व शेतकरी वर्गाकडे दुर्लक्ष तसेच त्यांच्या शेती मालाची कवडी मोल खरेदी, शेतकरी आत्महत्या इत्यादी प्रश्न व शेतकरी व्यथा आपल्या काव्य रुपी शब्दात गोऊन शेतकऱ्यांना त्यांचे शेती हक्क मिळावे. त्यांच्या व्यथाना वाचा फुटावी या साठी वैजापूरचे जेष्ठ साहित्यिक धोंडीराम सिंह राजपूत यांनी लिहिलेल्या काव्यरुपी ११२कवितांचा संग्रह 'चिंतातुर शेतकरी' तालुक्याचे शासनाने शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार देऊन गौरविलले शेतकरी आप्पासाहेब रामकृष्ण पाटील यांना सोमवार(ता,१०)रोजी वि.पा. महाविद्यालयात देऊन शेतकरी प्रश्नावर वाचा फोडण्याची विनंती धोंडीरामसिंह राजपूत यांनी केली. 'शेती जगली तर देश जगेल','शेती टिकली तर शेतकरी टिकेल' तसेच 'शेती संस्कृती –देशाची संस्कृती' या साठी सर्वंकष प्रयत्न करण्याची विनंती ही राजपूत यांनी आप्पासाहेब पाटील यांच्याकडे केली.

# 'हर घर तिरंगा' उपक्रमास पिंपळे सौदागरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



पुणे दि. १० ( प्रतिनिधी ) – भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी परंपरेला पुढे नेत यंदाही ' हर घर तिरंगा ' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांनी पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांना तिरंगा झेंड्यांचे वाटप केले. गोविंद गार्डन हॉटेलच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटना, आनंद हास्य योगा क्लब, श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्था, केशव शंखनाद पथक या संघटनांचे पदाधिकारी, सदस्य तसेच अण्णासाहेब मगर माध्यमिक प्रशालेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनी प्रत्येक घरी राष्ट्रध्वज फडकवून देशाप्रती असलेला आपला अभिमान व्यक्त करावा या भावनेतून ' हर घर तिरंगा ' हे अभियान हाती घेण्यात येत असल्याचे शत्रुघ्न बापू काटे यांनी यावेळी सांगितले. राष्ट्र भक्तीवर गीतांच्या पार्श्वभूमीवर रिंगण करुन प्रत्येकाच्या हातात तिरंगा ध्वज देण्यात आला. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरमब च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या कार्यक्रमास पिंपळे सौदागर प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे तसेच भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मनोज ब्राह्मणकर, उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, भानुदास काटे, बाळू परघळे, डॉ. सुभाषचंद्र पवार, अशोक वारकर, प्रणिता अवधूत, दिगंबर राजगुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# जरांगे पाटील यांचा आम्हाला आदर; गैरसमज करून घेऊ नये - डॉ. तायडे पाटील



## 'त्या' बैठकीचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संबंध नसल्याचा खुलासा



छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा आम्ही नेहमीच आदर केला असून, मराठा समाजाला दिशा देणारे ते मोठे नेतृत्व आहे. मात्र, कोणाकडूनही मिळालेल्या अपुऱ्या अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे गैरसमज करून घेण्याऐवजी संबंधित घटनेची वस्तुस्थिती जाणून घ्यावी, अशी माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे राज्य उपाध्यक्ष डॉ. संजयराव तायडे पाटील यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केले.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सांगण्यावरून जरांगे पाटील यांच्या विरोधात बैठक घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. मात्र, या बैठकीचा शिंदे यांच्याशी कोणताही संबंध नव्हता, असे डॉ. तायडे यांनी स्पष्ट केले. संबंधित दिवशी रविवार असल्याने शाळा-महाविद्यालयांना सुट्टी होती. मराठा समाजासाठी गेल्या सुमारे ३० वर्षांपासून काम करणाऱ्या जुन्या सहकाऱ्यांची बैठक जवळच्या शिवछत्रपती कॉलेजच्या सभागृहात नियोजित होती. तेथे दुसरा कार्यक्रम असल्याने अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या शाळेची जागा एक-दोन तास चर्चेसाठी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली. बैठकीतील अनेक जण त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक असल्याने विनंती मान्य करण्यात आली. यामागे कोणताही राजकीय हेतू किंवा जरांगे यांच्या विरोधातील भूमिका नव्हती, असे त्यांनी सांगितले.

तसेच मुख्यमंत्री असताना एकनाथराव शिंदे यांच्या सरकारने मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण मिळावे यासाठी ठोस पावले उचलली. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण सिद्ध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत राज्यव्यापी सर्वेक्षण करण्यात आले. न्या. सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाचा अहवाल स्वीकारून त्याच्या आधारे मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यात आले.

तसेच पात्र मराठा व्यक्तींना कुणबी जात प्रमाणपत्र मिळण्यातील अडचणी दूर करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. जुन्या महसुली, शैक्षणिक, निजामकालीन व अन्य शासकीय अभिलेखांमधील कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम राबवून पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली. त्यामुळे एकनाथराव शिंदे हे जरांगे पाटील किंवा मराठा समाजाच्या विरोधात आहेत, असा गैरसमज निर्माण करणे योग्य नाही. वैयक्तिक अथवा राजकीय स्वार्थासाठी कोणी चुकीची किंवा अपूर्ण माहिती देत असेल, तर तिची खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. आम्ही जरांगे यांचे विरोधक नाही. त्यांच्याबद्दलचा आदर कायम असून, गैरसमज दूर करण्यासाठी आवश्यक असल्यास त्यांच्यासमोर संपूर्ण वस्तुस्थिती मांडण्यास तयार आहोत, असे डॉ. तायडे पाटील यांनी स्पष्ट केले.

# कॅप राउंडमधून नामांकित विधी महाविद्यालये गायब विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम; शासनाच्या हस्तक्षेपाची मागणी

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – विधी महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी कॅप-१ राउंड सुरू झाला असतानाच मुंबईतील दोन नामांकित महाविद्यालये प्रवेश प्रक्रियेतील पर्यायांमध्ये उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. याप्रकरणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी यूथ आयकॉन ऑफ महाराष्ट्राचे विद्यार्थी व युवा प्रतिनिधी निखिल काकडे यांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे ई-मेलद्वारे केली आहे.

विधी शाखेत शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेज (जीएलसी) आणि के.सी. लॉ कॉलेजमध्ये प्रवेश मिळिवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयांना प्रवेशासाठी पहिली पसंती दिली आहे. मात्र, सध्या सुरू असलेल्या कॅप-१ राउंडमध्ये या दोन्ही महाविद्यालयांचा पर्याय उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. ही महाविद्यालये प्रवेश प्रक्रियेत उपलब्ध का नाहीत, याबाबत अधिकृत आणि सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने याबाबत स्पष्टता देऊन विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, के.सी. लॉ कॉलेजसह इतर विधी महाविद्यालयांची कॅप राउंडमधील सद्यस्थिती, पात्रता आणि सहभागाबाबत अधिकृत माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

महत्त्वाच्या महाविद्यालयांचा कॅप-१ राउंडपासूनच समावेश करावा. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र हेल्पडेस्क सुरू करून, सीईटी सेलच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निखिल काकडे यांनी केली आहे.

# किन्नर समाजाचा 'आखाड पाणी पूजा' सोहळा उत्साहात संपन्न



## राज्यभरातून गुरु-शिष्यांची मोठी उपस्थिती; देवीची भव्य मिरवणूक, फुलांचा वर्षाव आणि बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) – किन्नर समाजाच्या पारंपरिक 'आखाड पाणी पूजा' सोहळ्याचा धुमधडाका छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागांतून किन्नर समाजातील गुरु, शिष्य तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. पारंपरिक वेशभूषा, धार्मिक विधी, देवीची मिरवणूक आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते.

या सोहळ्यात मुंबई, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, सातारा, सांगली यांसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून किन्नर समाजातील प्रमुख गुरु आणि त्यांच्या शिष्यांनी सहभाग घेतला. एकमेकांच्या भेटीगाठी घेत समाजातील एकोपा आणि बंधुभावाचा संदेशही यावेळी अधोरेखित करण्यात आला.

**देवीची भव्य मिरवणूक**

आखाड पाणी पूजेच्या निमित्ताने देवीची विधिवत पूजा करून शुभ मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत किन्नर समाजातील गुरु व शिष्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक पोशाख आणि धार्मिक वातावरणामुळे मिरवणुकीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. सहभागी गुरु-शिष्यांवर ठिकठिकाणी फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. या सोहळ्यात धार्मिक श्रद्धेसोबतच समाजातील परस्पर प्रेम, आपुलकी आणि एकतेचे दर्शन घडले. विविध जिल्ह्यांतून आलेल्या समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग



घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**दानधर्म करणाऱ्या नागरिकांसाठीही सुख-समृद्धीची प्रार्थना**

किन्नर समाजाला विविध प्रसंगी दानधर्म व सहकार्य करणाऱ्या नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. जे समाजबांधव किन्नर समाजाला दानधर्म करतात, त्यांच्या घरात सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. याचबरोबर समाजाच्या धार्मिक परंपरेनुसार बळीराजा सुखी राहावा, शेतकऱ्यांना चांगले पीक मिळावे, राज्यात भरपूर पाऊस पडावा आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, यासाठीही प्रार्थना करण्यात आली.

**राज्यभरातून समाजबांधवांची उपस्थिती**

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे राज्यातील विविध जिल्ह्यांतून झालेली मोठी उपस्थिती. मुंबई, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, सातारा आणि सांगलीसह अनेक भागांतील किन्नर समाजातील गुरु व त्यांच्या शिष्यांनी छत्रपती संभाजीनगर गाठले. त्यामुळे कार्यक्रमाला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या आयोजनात कमला गुरु, शिल्पा गुरु, कोमल गुरु यांच्यासह समाजातील विविध मान्यवरांचा सहभाग होता. तसेच पुण्याच्या रंजिता नायक यांच्यासह समाजातील पदाधिकारी व प्रमुख व्यक्तींनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**धार्मिकतेसोबत सामाजिक एकतेचा संदेश**

आखाड पाणी पूजा हा केवळ धार्मिक विधी न राहता समाजातील एकजूट, परस्पर सहकार्य आणि सर्वांच्या कल्याणाची भावना व्यक्त करणारा सोहळा ठरला. विविध भागांतून आलेल्या किन्नर समाजातील गुरु-शिष्यांनी एकत्र येत परंपरा जपण्याबरोबरच समाजाच्या प्रगतीसाठी आणि सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या या सोहळ्याने छत्रपती संभाजीनगरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले. राज्यभरातून आलेल्या समाजबांधवांच्या मोठ्या सहभागामुळे यंदाचा आखाड पाणी पूजा सोहळा विशेष संस्मरणीय ठरला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औट्रम घाटाचे काम तातडीने पूर्ण करा; चित्तेगाव-बिडकीन-ढोरकीन बायपासला मंजुरी द्या-खासदार संदिपान भूमरे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची खा.संदिपान भुमरे व आ.विलास भुमरे यांनी घेतली भेट; सोलापूर-धुळे महामार्गावरील निकृष्ट कामाबाबतही कारवाईची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रलंबित रस्ते व वाहतूक समस्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी खासदार संदिपान भुमरे आणि पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांबाबत चर्चा करून नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कामांना गती देण्याची मागणी करण्यात आली.

कन्नड तालुक्यातील औट्रम घाटाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी आग्रही मागणी खासदार संदिपान भुमरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली. अनेक वर्षांपासून या घाट परिसरातील वाहतुकीची समस्या कायम असून, या मार्गावरील काम पूर्ण झाल्यास वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्यास मदत होणार असून, परिसराच्या विकासालाही चालना मिळणार असल्याचे भुमरे यांनी निदर्शनास आणून दिले.

यासोबतच छत्रपती संभाजीनगर-पैठण मार्गावरील चित्तेगाव, बिडकीन आणि ढोरकीन गावांसाठी स्वतंत्र बायपास रस्त्यांना मंजुरी देण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणीही खासदार भुमरे यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर-पैठण हा जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचा वाहतूक मार्ग आहे. या मार्गावर विविध औद्योगिक क्षेत्रे असून, दररोज हजारो कामगार, कर्मचारी, व्यावसायिक तसेच मालवाहतूक करणारी वाहने या मार्गावरून ये-जा करतात. त्याचबरोबर श्री क्षेत्र पैठण हे महत्त्वाचे धार्मिक व पर्यटनस्थळ असल्याने वर्षभर मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक या मार्गाने प्रवास करतात.

चित्तेगाव, बिडकीन आणि ढोरकीन या प्रमुख गावांमधून महामार्गावरील वाहतूक जात असल्याने स्थानिक वाहतूक, पादचाऱ्यांची वर्दळ, बाजारपेठेतील व्यावसायिक व्यवहार आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे गर्दीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. परिणामी वाहनचालक, स्थानिक नागरिक आणि पैठणकडे जाणारे भाविक यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. वाहतूक कोंडीमुळे प्रवासाचा वेळ वाढण्याबरोबरच अपघाताचा धोकाही वाढत असल्याचे भुमरे यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

औद्योगिक वाहतूक आणि भविष्यातील वाढता विकास लक्षात घेता या गावांना बायपास देणे अत्यावश्यक आहे, असे सांगत खासदार भुमरे यांनी बायपासच्या कामांना तातडीने मंजुरी देण्याची मागणी केली. बायपासमुळे अवजड व लांब पल्ल्याची वाहतूक गावाबाहेरून वळविता येईल. त्यामुळे गावातील वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचेल, रस्ते सुरक्षा सुधारेल आणि औद्योगिक क्षेत्रासह श्री क्षेत्र पैठणला येणाऱ्या भाविकांना मोठा फायदा होईल.



दरम्यान, सोलापूर-धुळे महामार्गावरील करोडी ते तेलवाडी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा मुद्दाही खासदार संदिपान भुमरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर मांडला.

या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्याची अवस्था खराब झाल्यामुळे वाहनचालकांना वाहतुकीस अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच त्याची गुणवत्ता खराब झाल्याने संबंधित कामाची चौकशी करून दोषी संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भुमरे यांनी केली.

रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावीत, तसेच भविष्यात अशा प्रकारची निकृष्ट कामे होऊ नयेत यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

## महामार्ग सुरक्षा बळकटीकरणासाठी जिल्हा कृती दलाची स्थापना; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- फलोदी अपघात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा महामार्ग सुरक्षा कृती दल स्थापन करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा कृती दलाची स्थापना केल्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखालील या कृती दलामार्फत महामार्गांवरील अतिक्रमणे हटविणे, अनधिकृत पार्किंगला आळा घालणे, ब्लॅकस्पॉट्सवर आवश्यक उपाययोजना, रस्ते व स्ट्रीट लाईटची सुधारणा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा सक्षम करणे तसेच महामार्ग सुरक्षेबाबत 'Zero Tolerance' धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

या समितीचे अध्यक्ष स्वतः जिल्हाधिकारी हे असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक हे सदस्य सचिव आहेत. पोलीस आयुक्त, मनपा आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशीक परिवहन अधिकारी, अधीक्षक अभियंता- सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, नॅशनल हायवे व अहिल्यानगर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी मनपा आदी या समितीचे सदस्य आहेत. या समितीची बैठक दर १५ दिवसांनी होऊन आढावा घेतला जाणार आहे. महामार्ग सुरक्षेबाबत उल्लंघन करणाऱ्यांवर शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबिण्यात येणार आहे. या उपाययोजनांमध्ये राष्ट्रीय महामार्ग हद्दीत बेकायदेशीर ढाबे, हॉटेल्स, दुकाने, टपऱ्या हटविणे, महामार्ग सुरक्षा क्षेत्रात व्यावसायिक व इमारत बांधकामांना नवीन परवाने देण्यास व जुन्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यास बंदी घालण्यात आली आहे. अस्तित्वात असलेल्या सर्व परवान्यांची ३० दिवसांच्या आत तपासणी केली जाणार आहे. महामार्गालगत बेकायदेशीर पार्कींगवर बंदी घालण्यात आली आहे. बेकायदा पार्कींग, अतिवेग रोखण्यासाठी डिजीटल प्रणालीचा वापर केला जाईल. तसेच हायवे पेट्रोलिंग टीम तैनात करण्यात याव्यात. अपघात प्रवण क्षेत्रांची दुरुस्ती करण्यासाठी चिन्हके, पदथदिवे, क्रॅश बॅरियर लावून दुरुस्ती करण्यात याव्या, तसेच आपत्कालिन वैद्यकीय सेवा रुग्णवाहिका, जड क्रेन आदींची उपलब्धता २४ तास तैनात ठेवण्यात यावी असे आदेशात सष्ट करण्यात आले आहे.

## शासकीय वर्ग-२ जमिनींच्या संरक्षणासाठी विशेष मोहीम; ३९७ प्रकरणांत शर्तभंग निदर्शनास

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- शासकीय वर्ग २ जमिनींच्या संरक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शासकीय व वर्ग-२ जमिनींचे सविस्तर विश्लेषण, अभिलेख पडताळणी आणि शर्तभंग प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी आज पुनर्रचित विशेष शिबीर घेण्यात आले. या पडताळणीत एकूण ३९७ प्रकरणांत शर्तभंग झाल्याचे निदर्शनास आले. या सर्व प्रकरणांमध्ये नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज शासकीय व वर्ग २ जमिनींचा पुनर्रचित विशेष शिबीर आयोजीत केले होते. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, निलेश अपार, संगीता राठोड, उपविभागीय अधिकारी वेंकट राठोड, अपर तहसीलदार उमेश पाटील, तहसीलदार शिवानंद बिडवे, नायब तहसीलदार रेवणनाथ ताटे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या विशेष शिबिरात शासकीय व वर्ग-२ जमिनींच्या संरक्षणाच्या अनुषंगाने विशेष तपास पथकाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करणे,अनधिकृत हस्तांतरण रोखणे, प्रदान आदेशातील अटी व शर्तींचा भंग झालेल्या प्रकरणांची सखोल तपासणी करणे तसेच आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अशा जमिनींच्या पुनर्ग्रहणाची कार्यवाही गतिमान करणे, यावर विशेष भर देण्यात आला. त्या अनुषंगाने शासकीय व वर्ग-२ जमिनींचे मूळ अभिलेख, प्रदान आदेश, फेरफार नोंदी, सातबारा उतारे तसेच जमिनींच्या हस्तांतरणासंदर्भातील नोंदींची प्रकरणनिहाय पडताळणी करण्यात आली. शर्तभंग झालेल्या प्रकरणांमध्ये संबंधित जमिनींची सद्यस्थिती, हस्तांतरणाची प्रक्रिया आणि त्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे किंवा नाही, याचीही तपासणी करण्यात आली. शासकीय जमिनींचे संरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी GIS मॅपिंग आणि जिओ-टॅगिंग करण्यावर भर देण्यात आला आहे. याद्वारे शासकीय जमिनींचे अचूक स्थान, क्षेत्रफळ व सद्यस्थितीची माहिती अद्ययावत स्वरूपात उपलब्ध होणार असून, अतिक्रमण किंवा अनधिकृत हस्तांतरणास प्रतिबंध करण्यास मदत होणार आहे. आजच्या तपासणीत एकूण ३९७ प्रकरणांमध्ये शर्तभंग झाल्याचे निदर्शनास आले, असे अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी सांगितले. ग्रामिण ३३६ व शहरी भागातील ५५४ असे एकूण ८९० प्रकरणे तपासण्यात आली.



तसेच शासकीय व वर्ग-२ जमिनींच्या अनधिकृत खरेदी-विक्री व्यवहारांना आळा घालण्यासाठी महसूल विभागाने नोंदणी व मुद्रांक विभागाशी समन्वय साधावा. वर्ग-२ जमिनींच्या व्यवहारांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्याची आवश्यक परवानगी तसेच संबंधित अटी व शर्तींची काटेकोर पडताळणी करण्यात यावी. शासकीय हिताला बाधा पोहोचविणारे व्यवहार होणार नाहीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या.

शर्तभंगाची प्रकरणे प्रलंबित न ठेवता त्यांचा प्राधान्याने निपटारा करावा. ज्या प्रकरणांमध्ये शासनाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होईल, त्या प्रकरणांत नियमानुसार नोटीस, सुनावणी व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुढील कार्यवाही करावी. शासकीय जमिनींचे संरक्षण हा सर्वोच्च प्राधान्याचा विषय मानून सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

## विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामिण) कायदा गुरुवारी जिल्हास्तरीय पंच संमेलनाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- विकसीत भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान(ग्रामिण) कायदा २०२५ बाबत त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांचे जिल्हास्तरीय पंच संमेलन गुरुवार दि.१३ रोजी होणार आहे.

एमआयटी कॉलेज बीड बायपास येथे सकाळी ९ वा. हे संमेलन होणार आहे,असे उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी वि.भा. रो. व आ. ह. (ग्रामिण) रुपेश सिंगारे यांनी कळविले आहे.

या संमेलनास रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले हे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. तर इमाव कल्याण, दुग्ध विकास, अपारंपारिक उर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास आ. रमेश बोरनारे,जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, महापौर समीर राजुरकर, राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष इद्रीस मुलतानी, खा.संदिपान भुमरे, खा. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ. विक्रम काळे, आ.सतिश चव्हाण, आ.अंबादास दानवे, आ. सुहास शिरसाट,विधान सभा सदस्य आ. अब्दुल सत्तार, आ.प्रदीप जैस्वाल आ. प्रशांत बंब,आ. अनुराधाताई चव्हाण, आ. संजनाताई चव्हाण, आ. विलास भुमरे यांचीही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.या संमेलनास रोहयो विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनास उपस्थितीचे आवाहन विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

# बजाज ऑटोतील प्रशिक्षणार्थींच्या हक्कांसाठी मनसेचे आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- 'कमवा आणि शिका' या संकल्पनेच्या नावाखाली टीमलीज फाउंडेशन मार्फत बजाज ऑटो कंपनीमध्ये विद्यार्थी प्रशिक्षणार्थी (अप्रेंटिस) म्हणून कार्यरत असलेल्या हजारो युवक-युवतींच्या विविध मागण्या व समस्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज बजाज ऑटो लिमिटेड कंपनी येथे आंदोलन करण्यात आले.

टीमलीज कंपनीमार्फत गेल्या अनेक वर्षांपासून युवक-युवतींना बजाज ऑटोमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून कामाची संधी देण्यात आली आहे. मात्र, डिग्री न मिळणे, अल्प मानधनावर कामगारांप्रमाणे काम करून घेणे, मानधनात वाढ न करणे तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर भवितव्याबाबत स्पष्टता नसणे, अशा विविध समस्या प्रशिक्षणार्थींनी मनसेसमोर मांडल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून मनसे पदाधिकारी राजू घोरपडे हे संबंधित युवक-युवतींच्या सातत्याने संपर्कात असून, त्यांच्या समस्या मनसे नेते तथा माजी गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. दोन दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यादरम्यान बाळा नांदगावकर साहेबांनी प्रशिक्षणार्थी युवक-युवतींच्या समस्या सविस्तरपणे जाणून घेतल्या आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी मनसे पदाधिकाऱ्यांनी ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार आज मनसेच्या वतीने हजारो विद्यार्थी प्रशिक्षणार्थी युवक-युवतींसह बजाज ऑटो कंपनी येथे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर मनसे पदाधिकारी, टीमलीज कंपनीचे प्रतिनिधी, बजाज ऑटो कंपनीचे प्रतिनिधी आणि पोलीस प्रशासन यांच्यात बैठक घेण्यात आली. बैठकीत युवक-युवतींच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर टीमलीज कंपनीने झालेल्या चर्चेसंदर्भातील लेखी पत्र मनसे पदाधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, युवक-युवतींच्या प्रश्नांवर सकारात्मक व त्यांच्या हिताचा मार्ग काढण्यासाठी बजाज ऑटो कंपनीचे सर्वेसर्वा राजीव बजाज हे येत्या आठवड्यात मनसे अध्यक्ष सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांची भेट घेणार असल्याची माहिती मनसे राज्य उपाध्यक्ष दिलीप चितलांगे यांनी बैठकीदरम्यान फोनवरून दिली.

'हा प्रश्न हजारो युवक-युवतींच्या भवितव्याशी संबंधित आहे. त्यांच्या न्याय्य मागण्यांवर योग्य तोडगा निघेपर्यंत महाराष्ट्र नवनिर्माण सेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील.

युवकांच्या भवितव्याशी कोणालाही खेळू दिले जाणार नाही,' अशी स्पष्ट भूमिका मनसे जिल्हा संपर्क अध्यक्ष बिपीन शंकरसिंग नाईक यांनी व्यक्त केली. या आंदोलनाचे नियोजन मनसे पदाधिकारी राजू घोरपडे यांनी विद्यार्थी प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी गणेश कावळे व त्यांच्या सहकाऱ्यांसोबत केले.

यावेळी मनविसेचे राज्य सरचिटणीस राजीव जावळीकर, राज्य उपाध्यक्ष मंगेश साळवे, जिल्हा सचिव रोहित ठेंगे, जिल्हा उपाध्यक्ष कार्तिक पाटील यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर आणि पोलीस निरीक्षक गाडे यांच्यासह पोलीस प्रशासन उपस्थित होते.

## शासकीय विभागीय ग्रंथालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त आज कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ एस आर रंगनाथन यांच्या जयंतीदिनी शहरातील समर्थ नगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्ताने बुधवार, दि १२ रोजी दुपारी ३ वाजता 'संवाद ग्रंथपालांशी' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यक्ष म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. सुभाष चव्हाण उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून मॉर्डन कॉलेजचे प्राचार्य डॉ. नामदेव सानप, विवेकानंद कॉलेजचे ग्रंथपाल डॉ.गोवर्धन औटे ,जिल्हा ग्रंथालय संघाचे विष्णू बोडके, दै. लोकमतच्या वरिष्ठ ग्रंथपाल डॉ. रमा धर्माधिकारी, खडकेश्वर वाचनालयाच्या ग्रंथपाल समता लोंढे, शिशुविहार माध्यमिक शाळेच्या ग्रंथपाल स्मिता आगलावे, बलवंत वाचनालयाचे ग्रंथपाल भारत सुरवसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत .

याप्रसंगी ग्रंथालय चळवळीत काम करणारे मोहल्ला लायब्ररीचे संचालक मिर्झा अब्दुल कय्युम नदवी व ग्रंथ मित्र लक्ष्मण मोरे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास ग्रंथपाल तसेच ग्रंथालय चळवळतील कार्यकर्ते पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

(पान १ वरुन)

## विलंबाने मिळणाऱ्या भूसंपादन..

सह संचालक आणि एक अपर संचालक अशा चार पदांच्या निर्मितीस आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारने राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ॲग्रीस्टॅक योजनेच्या अंमलबजावणीसाठीही ॲग्रीस्टॅक संचालनालय स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कृषी अभियांत्रिकी, मालमत्ता व्यवस्थापन व ॲग्रीस्टॅक संचालनालय स्थापन करण्यात आले आहे. त्यासाठी कृषी संचालक, अपर संचालक, सहसंचालक (सांख्यिकी) आणि सहसंचालक(माहिती-तंत्रज्ञान) अशी चार पदे निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे.

## भाजपने कसला विकास केला,...

"गडचिरोली जिल्ह्यात जो खाण उद्योग आहे, तिथे हजारो-लाखो वाहने चालत आहेत. त्या वाहनांखाली गेल्या वर्षभरात १५०० आदिवासी चिरडून मेले आहेत. एफआयआर नको म्हणून त्यांचे मृतदेहसुद्धा गायब केले जातात. पाच मिनिटांत ती बॉडी हलवली जाते, पाणी मारून रक्त साफ केले जाते आणि पुरावे नष्ट केले जातात. हा साधारण एक-दीड वर्षाचा आकडा आहे आणि याची नोंद कुठेही ठेवली जात नाही. जवळपास १५०० लोक मारले गेले आहेत," असा दावा त्यांनी यावेळी केला.

## मित्रासोबत हायवेवर थांबलेल्या...

तलासरी पोलीस ठाण्यात सहा आरोपीं विरोधात गुन्हा दाखल असून तीन आरोपींना अवघ्या काही तासातच तिघांना अटक करण्यात आली आहे. तर, इतर तीन फरार असून आरोपींचा शोध सुरू आहे.

१९ वर्षीय तरुणीने पोलिसांत तक्रार दिली की, ती तरुणी तिच्या मित्रासह दुचाकीवरुन फिरायला गेली होती, दरम्यान खामगाव येथे त्यांची दुचाकी स्लीप झाल्याने ते खाली पडले. त्याचवेळी पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन इसमांनी तरुणीच्या मित्राला दमदाटी करुन हाकलून लावले. त्यानंतर, दुचाकीवरील तिघांनी आणखी तीन जणांना बोलावून घेतले. तसेच, पीडित तरुणीला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून खामगावजवळील एका बंद डाक बंगल्यावर नेले, या बंगल्याच्या कट्ट्यावर सहा जणांकडून तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला, अशी फिर्याद तलासरी पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी देखील तत्परतेनं तीन आरोपींना अटक केली आहे. तसेच, त्यांच्यावर बीएनएस ७०/१ नुसार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देशासाठी कोणतेही बलिदान न...

प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण खासदारांनी पंतप्रधानांची भेट घेण्यात आक्षेप घेण्यासारखे काही नाही. आगामी काळात डीलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयक जर संविधानाच्या विरोधात असेल आणि त्यामुळे प्रातिनिधिक समतोल बिघडणार असेल, तर त्याला सर्व देशवासीयांनी आणि राजकीय पक्षांनी विरोध केला पाहिजे." दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेवर विश्वास न ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

२०१४ मध्ये पृथ्वीराज चव्हाण यांच्यामुळेच सत्ता गेली, या उद्धव ठाकरे गटाच्या आरोपावर उत्तर देताना सपकाळ यांनी पृथ्वीराज चव्हाण यांची पाठराखण केली. ते म्हणाले, "पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राचा कारभार अत्यंत पारदर्शकपणे आणि चांगल्या पद्धतीने हाताळला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य काँग्रेस पक्षाला दिले असून, राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचे काम अत्यंत वाखाणण्याजोगे राहिले आहे."

आगामी काळातील काँग्रेसच्या भूमिकेबाबत बोलताना ते म्हणाले, "राज्यात भ्रष्टाचार बोकाळला आहे. भारतीय जनता पक्ष जाती-पाती, धर्म आणि पंथाच्या नावावर समाजात फूट पाडून राजकारण करत आहे. त्यांचा हा डाव आम्ही हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही. याविरोधात काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून आंदोलनात्मक भूमिकेतून तीव्र संघर्ष करेल असे ते म्हणाले.

## अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील; भारताचा चीनला स्पष्ट संदेश!

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- अरुणाचल प्रदेशमधील २७ महत्वाच्या आणि ऐतिहासिक ठिकाणांची 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या अधिकृत नकाशावर, त्यांच्या मूळ भारतीय नावांसह अधिकृत नोंद करण्याच्या भारताच्या निर्णयाने, चीनचा अक्षरशः तिळपापड झाला आहे. चीनने यावर आक्षेप घेत, हे नामांकन 'बेकायदेशीर' असल्याचे म्हटले आहे. मात्र, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने चीनचा हा दावा पूर्णपणे फेटाळून लावत, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील, अशा स्पष्ट शब्दांत चीनला पुन्हा एकदा स्पष्ट संदेश दिला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी चीनच्या जळजळीवर स्पष्ट उत्तर दिले आहे. ते म्हणाले, 'अरुणाचल प्रदेश हा भारताचे अभिन्न अंग आहे. हे एक स्वयंस्पष्ट सत्य असून कोणतेही बनावट दावे अथवा आक्षेप हे वास्तव बदलू शकत नाहीत.'

चीन सातत्याने अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलून, त्यांना सातत्याने काल्पनिक नावे देण्याचा खोडसाळपणा कर असतो. मात्र, याला चोख प्रत्युत्तर देत भारताने राज्य सरकारच्या संमतीने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा तब्बल २७ ठिकाणांना भारतीय नकाशावर त्यांच्या मानक नावांसह मान्यता दिली आहे. यात १९५९ मधील संघर्षाचे केंद्र राहिलेले 'लोंग जू', १९६२ च्या युद्धातील ऐतिहासिक 'थॅग ला' खिंड, आणि जसवंत गड यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि ऐतिहासिक सीमावर्ती भागांचाही समावेश आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी भारताच्या या अधिकृत नोंदींवर आक्षेप घेत, हे पाऊल 'अवैध' असल्याचा कांगावा करायला सुरुवात केली आहे. चीन तिबेटला 'शीझांग' आणि अरुणाचल प्रदेशला 'झियांगनान' असे संबोधून त्यावर आपला दावा सांगत असतो. मात्र, भारताने चीनच्या या कृत्याला 'निरर्थक आणि हास्यास्पद' ठरवत, अशा कृत्यांमुळे प्रत्यक्ष वस्तूस्थिती कधीही बदलणार नाही, असा असे ठामपणे सांगितले आहे.

## 'कॉकरोच जनता पार्टी'च्या संस्थापकाविरोधात आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांचे पोलीस संरक्षण तात्काळ काढून घेण्यात यावे आणि त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई व्हावी, या मागणीसाठी मंगळवार, ११ ऑगस्ट रोजी पोलीस बॉईज संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मूक आंदोलन केले. स्थानिक पातळीवर सध्या 'पोलीस बॉईज असोसिएशन' विरुद्ध 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके असा थेट संघर्ष पेटला आहे. या संघर्षाची ठिणगी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उंबरठ्यावर पडली. दिपके यांच्या कार्यपद्धतीचा आणि त्यांच्या पक्षाच्या भूमिकेचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी पोलीस बॉईज संघटनेने रस्त्यावर उतरून आंदोलन केले.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ७ ऑगस्ट रोजी अभिजित दिपके यांच्या निवासस्थानी भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांना पोलिस उद्धट वागणूक देत असल्याचा आरोप अभिजित दिपके यांनी केला होता. पोलिसांच्या या दंडेलशाहीवर संताप व्यक्त करत, 'मी कुणाला भेटायचं, हे पोलिसांनी मला सांगायची गरज नाही. मी कुणाला भेटणार हे केवळ मीच ठरवणार,' असे आक्रमक शब्दांत सुनावत त्यांनी एका पोलीस अधिकाऱ्याला तिथून जाण्यास सांगितले होते. या साऱ्या प्रकारानंतर पोलीस बॉईज संघटना आक्रमक झालीय.

दैनिक लोकविजय

CHANGE OF NAME

I AM CHANGING MY NAME FROM FEROZ AZIZ KHAN TO FEROZ KHAN AZIZ KHAN FOR PASSPORT ISSUANCE
ADDRESS : 4-31-2-112 ,BADA TAKIYA, DEOGIRI COLONY, AURANGABAD.